# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.
प्रत्र क्र.रासेयो/८०१/२०१५—१६
दिनांक :— ०३. ११. २०१५.

प्रति,
प्राचार्य,
.................................,
.................................,

संदर्भ:— जा.क्र.अपोमसं(वा)/४५/नियो/रस्ता सुरक्षा अभियान—२०१६/पुरस्कार/२०१५/४१२४
दि.: १९/१०/२०१५

विषय:— रस्ता सुरक्षा अभियान राज्यस्तरीय पुरस्कार

मा. महोदय/महोदया,

पोलिस अधीक्षक (मुख्यालय), अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या उपरोक्त परिपत्रकानुसार व राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यात सर्व विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना मार्फत दिनांक १ ऑगस्ट, २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ दरम्यान रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येणार आहे.

महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांच्या साहय्याने लोकांमध्ये रस्ते सुरक्षा विषयी विविध उपक्रम राबवून जनजागृती करुन सदरचे अभियाना अंतर्गत नमुद केलेले उपक्रम जी महाविद्यालये वर्षभर मोठया प्रमाणावर जनसामान्याना रस्ता सुरक्षा विषयी जनजागृती करतील अश्या महाविद्यालयांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

रस्ता सुरक्षा अभियाना अंतर्गत महाविद्यालयातर्फे राबविण्यात येणारे अपेक्षित उपक्रम व रस्ते सुरक्षा अभियान राज्य स्तरीय पुरस्कारसंबधी सविस्तर माहिती सोबत जोडली आहे. कृपया सदरचे अभियाना अंतर्गत विविध उपक्रम /कार्यक्रम आयोजित करुन युवकामध्ये रस्ता सुरक्षा संदर्भात जाणिव जागृती करण्यात यावी.

कळावे !

आपला विश्वासु,

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग

सोबत :— उपक्रम व रस्ते सुरक्षा अभियान राज्य स्तरीय पुरस्कारसंबधी सविस्तर माहिती सोबत जोडली आहे

# '' रस्ता सुरक्षा अभियान राज्यस्तरीय पुरस्कार''

(I) राज्यस्तरीय पुरस्कार :—

**हे पुरस्कार शासनाच्या मंजुरीच्या अधीन राहुन अदा केले जातील**

(II) पुरस्काराच्या अटी/नियम व गुण विभागणी :—

१) विद्यापीठ अंतर्गत सर्वच महाविद्यालयांनी रस्ता सुरक्षा अभियानामध्ये योगदान देणे अपेक्षित आहे.
२) सर्वच विद्यार्थ्यापर्यत अभियानाची संकल्पना पोहचणे अपेक्षित आहे.
३) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणाऱ्या विद्यापीठांना अधिकचे गुण.

(III) गुणाचे निकष :—

अ) प्रत्यक्ष रस्ता सुरक्षा अभियानामधील उपक्रम जास्तीतजास्त ४० गुण उदा. पथनाटय, घोषवाक्य / प्लेकार्डस धरुन रस्त्याच्या दुतर्फा/ गर्दीच्या ठिकाणी/रेल्वे स्टेशन/बस स्थानक येथे जनजागृती
ब) रस्ता सुरक्षा या विषयावर निबंध स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वादविवाद स्पर्धा घेवून जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणे ३० गुण.
क) सर्वसामान्य चालक व नागरीकामध्ये रस्ता सुरक्षा या विषयी जनजागृतीकरीता केलेले प्रयत्न २० गुण.
ड) विद्यापीठाने आयोजित केलेल्या / महाविद्यालयाने आयोजित केलेल्या युवा महोत्सवामध्ये रस्ता सुरक्षा बाबतीत एका विषयावर स्पर्धा. जास्तीतजास्त २० गुण.
इ) अपघात घडल्या नंतर प्रत्यक्ष जखमींना सहाय्य किंवा प्रथोमचार याबाबत केलेली मदत. जास्तीतजास्त २० गुण.
ई) जनसमुदाया मध्ये व्याख्यानाव्दारे प्रचार आणि प्रसार. जास्तीतजास्त २० गुण.
उ) रोड—शो (हयुमन रॅली) शोभा यात्रा, पथनाटय सादरीकरण इ. जास्तीतजास्त २० गुण.
ऊ) विद्यापीठ स्तरावरील उपक्रम. जास्तीतजास्त २० गुण.
ए) सुबक, आकर्षक पुरस्कार प्रस्तावास. जास्तीतजास्त १० गुण.
ऐ) कार्यशाळेचे आयोजन (संघ नायक, कार्यक्रम अधिकारी, लोकप्रतिनिधी जास्तीतजास्त २० गुण.
इ) आर. टी. ओ. कार्यालया मार्फत वाहन चालविण्याचा परवाना मिळवून देण्याबाबतची कार्यशाळा/शिबीर जास्तीतजास्त १० गुण.
ओ) विद्यार्थी व पालक कार्यशाळेमध्ये रस्ता सुरक्षा बाबत जाणिव जागृती जास्तीतजास्त १० गुण
अं) नाविण्यपूर्व उपक्रम १० गुण
अ:) ज्या विद्यापीठामार्फत जास्तीतजास्त महाविद्यालये, जास्तीत जास्त विद्यार्थी सहभागी होतील अशा विद्यापीठांना व महाविद्यालयांना जास्तीतजास्त ५० गुण.

## '' अभियानाची सुरुवात आणि प्रस्ताव सादरीकरनाची तारीख''

१) अभियानाची सुरुवात/कालखंड:— **दिनांक १ ऑगस्ट २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५**

२) स्पर्धा महाविद्यालयीन स्तरावर असून महाविद्यालयाच्या पुरस्कारा बरोबरच त्या विद्यापीठाला मानाचा करंडक (फिरता)

३) निवड प्रक्रिया जिल्हा स्तरावर पहिल्या दोन महाविद्यालयांचे प्रस्ताव विद्यापीठाकडे शिफारस यासाठी निवड समिती पुढील प्रमाणे:—
समितिने **१० डिसेंबर, २०१५** पर्यत प्रस्ताव विद्यापीठाकडे पाठविणे.

१) विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवायोजनेचे समन्वयक — अध्यक्ष
२) प्रतिथयश राष्ट्रीय सेवायोजनेचे समन्वयक
३) प्रतिथयश सामाजिक कार्यकर्ता
४) जिल्हा पोलीस वाहतूक विभागातील प्रतिनिधी.
५) जिल्हा समन्वयक, — सचिव (रा. से. यो.)

(४) विद्यापीठ स्तरीय समिती :— प्रत्येक जिल्हयातुन जिल्हा समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावाची छानणी करुन पहिल्या दोन प्रस्तावाची राज्यस्तरीय पुरस्करासाठी शिफारस करताना विद्यापीठने/विद्यापीठाच्या अधिकारात पुरस्कार देऊ शकतात. विद्यापीठ समितीने हे पुरस्कार राज्य समिती/ वाहतूक विभाग यांचेकडे **२० डिसेंबर २०१५** पर्यत सादर करावेत. सादर करताना प्रस्तावाच्या गुणांसहित संक्षिप्त तक्ता करुन पाठवावेत.

१) मा. कुलगुरु — अध्यक्ष
२) मा. विभागीय उपसंचालक, उच्च शिक्षण
३) मा. सामाजिक कार्यकर्ता
४) मा. कुलसचिव
५) मा. विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनाचे समन्वयक — सचिव

५) राज्यस्तरीय निवड समिती:—

सर्वच विद्यापीठाकडून शिफारस केलेल्या पुरस्काराची छानणी करणे व पुरस्काराची नांवे घोषित करणे.

१) मा. अपर पोलिस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य ) — अध्यक्ष.
२) मा. कुलगुरु
३) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन.
४) मा. राज्य संपर्क अधिकारी, रा. से. यो. महाराष्ट्र शासन
५) मा. पोलिस अधिक्षक, वाहतूक विभाग, — सचिव

आपला नम्र

(बाळासाहेब पाटील)
पोलीस अधीक्षक, (मुख्या.)
अपर पोलीस महासंचालक (वा.)
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे करिती